सहकारी गृहनिर्माण संस्थांना जमिन
देण्यासंबंधातील धोरण
शासन निर्णय दिनांक ९ जुलै १९९९ मधील
तरतुदीबाबत स्पष्टीकरण/खुलासा.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक क्र.एलसीएस ०४/प्र.क्र.१५/ज-१
मंत्रालय,मुंबई-४०००३२,
दिनांक : ८ जुलै,२००४

वाचा :-

१) शासन निर्णय,महसूल व वन विभाग क्र.एलसीएस १०९५/प्र.क्र. ३७/९५/ज-१, दिनांक ९ जुलै,१९९९.

२) शासनाची महसूल व वन विभागाची क्र.एलसीएस १०९५/प्र.क्र.३७/९५/ज-१, दिनांक ८ जानेवारी २००१ व दिनांक १० फेब्रुवारी २००१ ची पूरकपत्रे.

३) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.एलसीएस १०/२००२/ प्र.क्र.३४४/ ज-१,दिनांक ३ जुलै २००३.

४) महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम १९९९ प्रसिध्द करणारी गृहनिर्माण व विशेष सहाय विभागाची दिनांक १० मार्च २००० ची शासन अधिसूचना

शासन परिपत्रक :

शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.एलसीएस १०९५/प्र.क्र.३७/९५/ज-१, दिनांक ९ जुलै १९९९ अन्वये सहकारी गृहनिर्माण संस्थांना जमिन देण्यासंबंधातील धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. शासन पूरकपत्र महसूल व वन विभाग क्र.एलसीएस १०९५/प्र.क्र.३७/९५/ज-१, दिनांक ८ जानेवारी २००१ अन्वये,घातलेल्या अट क्र.१० मध्ये, भाडेकरु/पोटभाडेकरु या संज्ञेत,प्रदायी अतिथी (पेईंग गेस्ट) चा अंतर्भाव होत नाही असे स्पष्ट करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( रा. शं. नागरे )
अवर सचिव,
महसूल व वन विभाग.

| अ. क्र. | शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक | प्रचलित तरतूद | सुधारीत तरतूद |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २ | जोडपत्र अ मधील क्रमांक १ | संस्थेचे सदस्य हे निदान १५ वर्षे महाराष्ट्राचे रहिवाशी असले पाहिजेत. तथापि, महाराष्ट्र राज्यास नेमून दिलेले सरकारी कर्मचारी, संसद सदस्य, विधानसभा/ विधानपरिषद सदस्य आणि आजी किंवा माजी सैनिक इत्यादिंच्या बाबतीत कालावधी विनिर्दिष्ट कालावधीपेक्षा कमी असेल त्यांना ही अर्हता लागू होणार नाही. | संस्थेचे सदस्य हे निदान १५ वर्षे महाराष्ट्राचे रहिवाशी असले पाहिजेत. तथापि, महाराष्ट्र राज्यास नेमून दिलेले सरकारी कर्मचारी, महाराष्ट्र राज्यातून निवडलेले संसद सदस्य, महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद सदस्य आणि महाराष्ट्रातील आजी किंवा माजी सैनिक, महाराष्ट्रातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी, इत्यादिंच्या बाबतीत कालावधी विनिर्दिष्ट कालावधीपेक्षा कमी असेल त्यांना ही अर्हता लागू होणार नाही. |

| अ. क्र. | अनुज्ञेय चटईक्षेत्र | शासकीय कर्मचारी नसलेल्या लाभार्थीकरिता उत्पन्नाची मर्यादा (प्रचलित तरतूद) | सुधारीत उत्पन्नाची मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | ३०० चौ. फूट | रु. ५,०००/- पर्यन्त | रुपये ८,०००/- पर्यंत |
| २ | ४५० चौ. फूट | रु. ५,००१ ते ७,५००/- | रुपये ८,००१/- ते रुपये १२,०००/- |
| ३ | ६५० चौ. फूट | रु. ७,५०१ ते १२,५००/- | रुपये १२,००१/- ते रुपये २०,०००/- |
| ४ | १०७६ चौ. फूट | अनुज्ञेय नाही | अनुज्ञेय नाही. |

२. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या (अनौपचारिक संदर्भ क्रमांक ८६४/व्यय ९/, दिनांक २५.८.२००४ अन्वये) सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(रा. शं. नागरे)

अवर सचिव,

महसूल व वन विभाग.